**कृपया प्रसिध्दीसाठी -** **4 डिसेंबर 2013**

## विक्रांत नव्हे, काँग्रेस सरकार देशाची अस्मिताच लिलावात काढत आहेत: राम नाईक

**मुंबई, बुधवार:**''विक्रांत नव्हे तर या देशाची अस्मिताच हे काँग्रेस सरकार लिलावात काढू पाहात आहे. देशाच्या संरक्षणामध्ये ऐतिहासिक कामगिरी बजावलेली विक्रांत ही केवळ युद्धनौका नव्हे तर देशाचे मानचिन्ह म्हणून ओळखली जात असताना सरकारने लिलावाची भाषा करावी हे दुःखद व संतापजनक आहे.'', अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली. 31 जानेवारी 1997 रोजी विक्रांत युद्धनौका म्हणून न वापरण्याचा निर्णय संरक्षण मंत्रालयाने केल्यानंतर तिचे संग्रहालयात रुपांतर करावे अशी तात्काळ मागणी लोकसभेत करुन व तिचा पाठपुरावा करुन त्याप्रमाणे निर्णय झाल्यानंतर आता 15 वर्षांनी तिचा लिलाव करण्याचा निर्णय ऐकून संतप्त झालेल्या श्री. नाईक यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

सर्वप्रथम 21 मार्च 1997 रोजी लोकसभेत विशेष उल्लेख वक्तव्य म्हणून 14 युद्धांमध्ये सहभागी झालेले विक्रांत हे 'देशभक्ति व आधुनिक भारताच्या शौर्याचे प्रतिक असल्याने ते जतन करण्यात यावे अशी मागणी श्री. नाईक यांनी केली होती. पुढे त्यांनी त्याचा सातत्याने पाठपुरावाही केला. 1999 मध्ये केंद्रात वाजपेयी सरकार आल्यानंतर विक्रांत एक स्मारक म्हणून सुक्या गोदीत विराजमान झाली. परंतु त्यानंतर सत्तेत आलेल्या काँग्रेस सरकारने दाखविलेल्या अनास्थेमुळे स्मारक प्रकल्पाचा खर्च अव्वाच्या सव्वा वाढत गेला. तरीही अजून वेळ गेलेली नाही. ''सरकारने विक्रांत जतन केली पाहिजे. या देशात सर्वप्रथम आरमार उभारण्याची दूरदृष्टी दाखविणा-या शिवाजी महाराजांचा वारसा महाराष्ट्राने जपलाच पाहिजे. अन्यथा काँग्रेस आघाडीचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नाकर्तेपणाची इतिहास नोंद करेल व जनता त्यांना क्षमा करणार नाही'', असे आग्रही प्रतिपादन श्री. नाईक यांनी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**